## ❖सर्वात वेगवान ९ हजार धावा पूर्ण करण्याचा विक्रम विराटच्या नावे :-




कानपूर एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार विराट कोहली याने शानदार शतक ठोकले. १०६ चेंडूंमध्ये विराटने ११३ धावांची खेळी केली. यात ९ चौकार आणि १ षटकारांचा समावेश आहे. एकदिवसीय कारकीर्दीतील विराटचे हे ३२ वे शतक असून त्याने या शतकासह एकदिवसीय सामन्यांमधील ९ हजार धावांचा टप्पाही ओलांडत त्याने सर्वात वेगवान ९ हजार धावा पूर्ण करण्याचा विक्रम आपल्या नावे केला.

एकुण १९४ इनिंगमध्ये ९ हजार धावा विराट कोहलीने पूर्ण केल्या. विराट या खेळीसह एवढ्या वेगाने ९ हजार धावा पूर्ण करणारा पहिलाच फलंदाज ठरला. हा विक्रम यापूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या एबी डिव्हीलियर्सच्या नावावर होता. डिव्हीलियर्सने २०५ इनिंगमध्ये ९ हजार धावा पूर्ण केल्या होत्या.

यापुर्वी माजी कर्णधार सौरव गांगुलीने २२८ इनिंगमध्ये ९ हजार धावांचा टप्पा पूर्ण करून भारतीय फलंदाजांमध्ये या यादीत अव्वल स्थान पटकावले होते. ९ हजार धावांचा टप्पा पूर्ण करण्यासाठी सचिन तेंडलुकरला २३५ इनिंग खेळाव्या लागल्या होत्या. या एकदिवसीय सामन्यात शानदार ११३ धावांची शतकी खेळी करणारा विराट ९ हजार धावांचा टप्पा पार

करणारा जगातील ११३ वा खेळाडू ठरला. एकदिवसीय सामन्यात ९ हजारांपेक्षा अधिक धावा करणारा विराट सहावा भारतीय खेळाडू आहे. मागील वर्षी भारताकडून यष्टीरक्षक महेंद्र सिंह धोनीने हा टप्पा पूर्ण केला होता. तसेच सचिन तेंडुलकर, सौरव गांगुली, राहुल द्रविड आणि मोहम्मद अझरुद्दीन यांनीही ९ हजारांपेक्षा अधिक धावांचा टप्पा ओलांडला आहे.